(12)

२५८

Tenants/Occu
9, Room no. 2,
EE/D-1/237

मुंबई इमारत दुरुस्ती आणि पुनर्रचना मंडळाच्या शनिवार दिनांक १६ ऑक्टोबर १९८३ रोजी संपन्न झालेल्या १२ बैठकीचा स्थायी करण्यात आलेला कार्यवृत्तांत.

मुंबई इमारत दुरूस्ती व पुनर्रचना मंडळ.

शनिवार दिनांक १६ ऑक्टोबर १९९३ रोजी झालेल्या १२ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत.

बाब क्रमांक:१२/१

मुंबई इमारत दुरूस्ती व पुनर्रचना मंडळाची १२ वी बैठक शनिवार दिनांक १६ ऑक्टोबर १९९३ रोजी सकाळी ११ वाजता गृहनिर्माण भवनातील तिसऱ्या मजल्यावरील सभागृहांत संपन्न झाली. या बैठकीस पुढील मान्यवर उपस्थित होते:

| | | |
|---|---|---|
| १] | डॉ. शंकर वामन मटकर, | सभापती. |
| २] | श्री. हेमराज शहा | उपसभापती. |
| ३] | श्री. अशोक लाल | मुख्य अधिकारी |
| ५] | श्री. यादवराव कांबळे उपसचिव, गृहनिर्माण व विशेष सहाय्य विभाग. | सदस्य. |
| ६] | श्री. पोतदार, प्रमुख अभियंता, मुंबई महानगरपालिका यांचे प्रतिनीधी. | सदस्य. |
| ७] | श्री. रॉकी क्रास्टो | सदस्य. |
| ८] | श्री. गजेंद्र लष्करी | सदस्य. |
| ९] | श्री. श्रीकांत पाटील | सदस्य. |
| १०] | श्री. चेतन शहा | सदस्य. |
| ११] | श्री. आजम खान | सदस्य. |
| १२] | श्री. विवेक भर्तू | सदस्य. |
| १३] | श्री. फारुख मन्सूरी | सदस्य. |
| १४] | श्री. शंकरराव पिटला | सदस्य. |
| १५] | श्री. कमलाकर शर्मा | सदस्य. |
| १६] | श्री. व्हि. बी. वरसकर | सदस्य. |
| १७] | श्री. ना. कृ. नाईक उप करनिर्धारक व संकलक, मुंबई महानगर पालिका. | निमंत्रित. |

२६२



मा. सभापती डॉ. शंकर वामन मटकर, यांचे अध्यक्षतेखाली सभेस प्रारंभ झाला. सभेचे नियमित काम सुरू होण्यापूर्वी नुकत्याच झालेल्या भूकंपात तसेच मुंबईत झालेल्या रेल्वे अपघातात मोठया प्रमाणात जोवितहानी झाल्याबद्दल सभागृहाने दोन मिनिटे स्तब्धता पाळून मृत व्यक्तींना श्रध्दांजी अर्पण केली. त्यानंतर मा. सभापती, उपसभापती, सदस्य व अधिकारी यांचे स्वागत करण्यांत आले. उपमुख्य अभियंता [मुख्यालय] या पदी नियुक्त झालेले श्री. जयंतीलाल शहा यांचा सदस्यांशी परिचय करून देण्यांत आला व सभेच्या नियमित कामास सुरुवात झाली.

पूर्तता
मुख्य अधिक
[ पु. गा.

पूर्तता
मुख्य अधिक

बाब क्रमांक : १२/१
:::::::::::::::

विषय:- दिनांक २७ सप्टेंबर १९९३ रोजी झालेल्या मंडळाच्या ११ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत स्थायी करणे.
x-x-x-x-x-x-x-x-x-x-x-x-x

दिनांक २७/९/९३ रोजी झालेल्या ११ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत पृष्ठ क्र. १ ते २१-अ वर सादर केला आहे. त्यावर सविस्तर चर्चा झाली. श्री. यादवराव कांबळे, उपसचिव यांनी सूचना केली की, मंडळाने घेतलेल्या निर्णयांची पूर्तता करणा-या संबंधित अधिका-यांचा उल्लेख कार्यवृत्तांताच्या भागात करण्यांत यावा. ही सूचना मान्य करण्यात आली. चर्चेअंती ११ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत यथा प्रस्तावीत स्थायी करण्यांत आला.

पूर्तता
सचिव.

पूर्तता
मुख्य अ

पूर्तता
मुख्य अ
[सं. f

बाब क्रमांक : १२/२
================

विषय:- अनुपालन अहवाल.
x-x-x-x-x-x-x

अनुपालन अहवाल पृष्ठ क्र. २३ ते ३५-अ वर सादर केला आहे, त्यावर सविस्तर चर्चा झाली. श्री. शंकरराव पिटला यांनी निदर्शनास आणून दिले की, पुनर्रचित

सविस्तर तपशिल सादर केलेला नाही. मुख्य अधिकारी यांनी खुलासा केला की १९७५ सालापर्यंत संक्रमण शिबीरात राहणाऱ्या रहिवाशांची बृहतसूची तयार करण्याच्या कामास प्राधान्य दिले असल्यामुळे अधिकाऱ्यांना या विषयीची माहिती संकलित करणे शक्य झाले नाही. पुढील बैठकीत ही सर्व माहिती सादर करण्याचे मान्य करण्यात आले.

पूर्तता
मुख्य अधिकारी
[पु.गा.]

श्री. व्ही. बी. वरसकर यांनी पुनर्रचित इमारतीमधील रिक्त गाळयांचे अनधिकृतपणे वितरण होत असल्याची तक्रार केली. या तक्रारीच्या संदर्भात चौकशी करण्याचे मान्य करण्यात आले.

पूर्तता
मुख्य अधिकारी

उप करनिर्धारक व संकलक मुंबई महानगरपालिका यांनी दुरूस्ती उपकर वसुलीच्या संदर्भातील सविस्तर माहिती सादर केली. श्री. चेतन शहा यांनी निदर्शनास आणून दिले की, मुंबई महानगरपालिकेकडून अंशदानाची रक्कम मार्च अखेरीस प्राप्त होते. ही रक्कम संपूर्ण वर्षात ६ हप्त्यामध्ये मंडळास मिळाल्यास दुरूस्ती व पुनर्बांधणी उपक्रम योग्य प्रकारे कार्यान्वित करणे शक्य होईल.

श्री. यादवराव कांबळे यांनी माहिती दिली की पुनर्रचित गाळयांमधील अनधिकृत व्यक्तींना नियमित करण्याविषयीची कार्यवाही १ नोव्हेंबर १९९३ ते ३१ डिसेंबर १९९३ या कालावधीत विशेष मोहीम उघडून सुरू करावी, असे ठरले.

पूर्तता
सहमुख्य अधिकारी

संक्रमण शिबीरातील घुसखोरी रोखण्याच्या दृष्टीने हत्यारी रक्षक [Armed Guards) नियुक्त करावेत अशी सूचना श्री. यादवराव कांबळे यांनी केली. यासंबंधी सविस्तर टिप्पणी पुढील बैठकीस सादर करावी, असे ठरले.

पूर्तता
उपमुख्य अधिकारी
[सं.शि.]

श्री. यादवराव कांबळे यांनी अशीही माहिती सादर केली की वाढीव दुरूस्ती खर्चाच्या मर्यादेच्या प्रमाणात [रु. ७५०/- प्रति चौ.मी.] दुरूस्ती उपकरात वाढ करण्याविषयीचा प्रस्ताव लवकरच मंत्रीमंडळाच्या बैठकीपुढे सादर करण्यात येत आहे.

२६४

...४/-

बाब क्रमांक : १२/३

विषय:- दुरूस्तीच्या खर्चात काटकसर

या विषयाची टिप्पणी पृष्ठ क्र. ३७ ते ६१ क्र. वर सादर केले आहे, त्यावर चर्चा झाली. मुख्य अधिकारी यांनी मंडळाच्या आर्थिक स्थितीची माहिती सभागृहास सादर केली. ३०/९/९३ पर्यंत झालेले प्रत्यक्ष खर्च लक्षात घेऊन दुरूस्तीचा सर्व निधी संपुष्टात आलेला आहे. परंतु अत्यंत धोकादायक अशा इमारतींची तातडीने दुरूस्ती करण्याची आवश्यकता लक्षात घेता दक्षिण विभागास रू. २.५० कोटी व उत्तर विभाग १.५० कोटी एवढा निधी ३१ मार्च १९९४ पर्यंतच्या उर्वरित कालावधीसाठी खर्च करण्यास अनुमती द्यावी, असा प्रस्ताव मुख्य अधिकारी यांनी सादर केला. याविषयावर सविस्तर चर्चा झाली. सदस्यांनी सूचना केली की, विशेष प्राधान्याने दुरूस्तीची आवश्यकता असलेल्या धोकादायक इमारतींची यादी तयार करण्याची आवश्यकता आहे. त्याचप्रमाणे पाया खचलेल्या इमारतींचा समावेश विशेष प्राधान्य यादीत करण्यात यावा. सविस्तर चर्चेअंती याविषयी निर्णय घेण्यासाठी पुढीलप्रमाणे उपसमिती नियुक्त करण्यात आली.

| | | |
|---|---|---|
| १] | डॉ. शंकर वामन मटकर, | सभापती |
| २] | श्री. हेमराज शहा | उपसभापती |
| ३] | श्री. चेतन शहा | सदस्य. |
| ४] | श्री. विवेक भर्तू | सदस्य. |
| ५] | श्री. अशोक लाल | मुख्य अधिकारी |
| ६] | श्री. आर. ई. मर्चंट | उ. मु. अ. [पुनर्रचना] |
| ७] | श्री. डी. आर. हडदरे | उ. मु. अ. [दक्षिण] |
| ८] | श्री. एस. ए. झुरानी | उ. मु. अ. [उत्तर] |

पूर्तता सचिव.

या उपसमितीची बैठक शुक्रवार दि. २२ ऑक्टो ९३ रोजी सकाळी ११.०० सभापतींच्या दालनात आयोजित करावी, असे ठरले.

बाब क्रमांक : १२/३/३

विषय :- पुनर्रचित इमारतीमधील गाळयांच्या भाडे आकारांत वाढ करण्याबिषयी.

या विषयाची टिप्पणी पृष्ठ क्र. ६९ ते ७१-ड वर सादर केली आहे. या विषयावर चर्चा झाली. मुख्य अधिकारी यांनी मंडळाची आर्थिक परिस्थिती विषद केलेली आहे. निधी अभावी मंडळास दुरूस्ती उपक्रम स्थगित ठेवावा लागत आहे. मुंबई शहरातील अत्यंत धोकादायक अशा इमारतींची दुरूस्ती स्थगित करणे अनुचित आहे. त्यामुळे शक्य होईल त्या मार्गाने मंडळास महसूली निधी वाढविण्याची नितांत आवश्यकता आहे. सध्या पुनर्रचित गाळयांना आकारण्यांत येणारे भाडे अत्यल्प असून इमारतींच्या देखभाल व दुरूस्तीचा खर्च मंडळास करावा लागत आहे. त्यामुळे पुनर्रचित इमारतीमधील गाळयांना वास्तव भाडे आकारण्यांत यावे, असा प्रस्ताव सभागृहासमोर विचारार्थ सादर केला आहे, असे प्रतिपादन मुख्य अधिकारी यांनी केले.

चर्चेच्या वेळी सदस्यांनी सूचना केल्या की, पुढील मार्गाने मंडळाचा महसूली व भांडवली निधी वाढविण्याच्या दृष्टीने प्रयत्न व्हावा.

१] भाडे थकबाकीची वसूली युध्द पातळीवर करणे.

२] रिक्त गाळे वितरीत करून, महसुली निधी वाढवावा.

३] २५ चौ. मीटरपेक्षा कमी क्षेत्रफळ असणाऱ्या गाळयांना सवलतीच्या दराने कर आकारण्याविषयी मुंबई महानगरपालिकेकडे अर्ज करणे.

४] रिक्त असणारे गाळे करातून वगळण्याविषयी मुंबई महानगरपालिकेस कळविणे.

५] पुनर्रचित इमारतीमधील अनुधिकृत रहिवाशांना नियमित करून, भांडवली निधी वाढविणे.

६] दुरूस्ती उपकराची मोठया प्रमाणांत असलेली थकबाकी वसूल करण्याच्या दृष्टीने उपाययोजना करणे.

७] मुंबई महानगरपालिकेने दुरूस्ती अनुदानात वाढ करावी यासाठी मुंबई महानगरपालिकेला विनंती करणे.

८] मुंबई महानगर विकास निधी [७८०१] मधून काही निधी दुरूस्ती उपक्रमासाठी मिळावा याद्दृष्टीने प्रयत्न करावे.

पूर्तता:
सहमुख्य अधिकारी.

वरील सूचना मान्य करण्यात आल्या. या संदर्भात प्रत्यक्ष कार्यवाही झाल्यानंतर नियुक्त केलेल्या उपसमितीच्या शिफारशींसह हा प्रस्ताव पुन्हा सादर करावा, असे ठरले.

बाब क्रमांक :१२/४

विषय:- पुनर्बांधणीच्या प्रस्तावास प्रशासकीय मंजुरी देण्याविषयी.

इमारत क्र. ३३, ३६-३६-अे चापसी भीमजी मार्ग ३८-अे, ४०-४४, ५० अे-बी-सी म्हातारपाखाडी रोड, माझगांव, मुंबई येथील पुनर्बांधणीच्या खर्चास प्रशासकीय मंजुरी मिळण्याविषयीचा प्रस्ताव पृष्ठ क्र. ७३ ते ७९ वर सादर केला आहे. या प्रस्तावाची सविस्तर माहिती कार्यकारी अभियंता-पु. वि. २ यांनी सादर केली. सविस्तर चर्चेअंती या योजनेच्या रू. १, ३३, २९, ४२०/- रकमेच्या खर्चास प्रशासकीय मंजुरी देण्याविषयी निर्णय घेण्यात आला.

ठराव क्रमांक :१२/९०

इमारत क्र. ३३, ३६-३६-अे, चापसी भिमजी मार्ग, ३८-अे, ४०-४४, ५० अे-बी-सी, म्हातारपाखाडी रोड, माझगांव येथील इमारतींच्या रू. १, ३३, २९, ४२०/- [रू. एक कोटी, तेहतीस लक्ष, एकोणतीस हजार, चारशे वीस फक्त.] एवढ्या खर्चास प्रशासकीय मंजुरी देण्याचा निर्णय एकमताने घेण्यात आला.

बाब क्रमांक: १२/५

विषय:- सहकारी संस्थांचे भू-संपादनाचे प्रस्ताव.

इमारत क्र. १८२-अ, १८८-अ, व १८८, मेमान चाळ, भवानी शंकर रोड, जी[दक्षिण] विभाग या इमारतींमधील रहिवाशांच्या "अमर मिलींद" या सहकारी गृहनिर्माण संस्थेसाठी भू-संपादनाचा प्रस्ताव पृष्ठ क्र. ८१ ते ९१ वर सादर केला आहे. या प्रस्तावाची सविस्तर माहिती कार्यकारी अभियंता/सहकारी संस्था कक्ष यांनी दिली. सविस्तर चर्चेअंती या भू-संपादन प्रस्तावास मंजुरी देण्याचा निर्णय घेण्यात आला.

ठराव क्रमांक: १२/९१

इमारत क्र. १८२-अ, १८८-अ व १८८, मेमान चाळ, भवानी शंकर रोड, जी[उत्तर] विभाग या इमारतीमधील रहिवाशांच्या नियोजित अमर मिलिंद या सहकारी गृहनिर्माण संस्थेचा इमारत सुस्थितीत ठेवण्यासाठी म्हाडा अधिनियम १०३-ब अन्वये सादर केलेला भू-संपादनाचा प्रस्ताव मंजुर करण्याचा निर्णय एकमताने घेण्यात आला.

बाब क्रमांक: १२/६

विषय:- इमारत क्र. २१-सी गोला लेन, वकील बिल्डींग, फोर्ट, मुंबई या इमारती-मधील रहिवाशांना पुनर्रचित इमारतीत कायम स्वरूपी पर्याय निवासस्थान देण्याविषयी.

वरील विषयाची टिप्पणी पृष्ठ क्र. ९३ ते ९७ वर सादर केली आहे. या विषयावर झालेल्या चर्चेअंती पुढीलप्रमाणे सूचना करण्यांत आल्या

१] या इमारतीमधील अधिकृत रहिवाशांची सविस्तर माहिती सादर करणे.

२] या इमारतीमध्ये झालेले अनधिकृत बांधकाम केव्हां निदर्शनास आले व त्यावेळी इमारतीची काय स्थिती होती याची माहिती सादर करणे.

पूर्तता

उपमुख्य अभियंता[द]

वरील सूचना मान्य झाल्या व या विषयासंबंधी सविस्तर अहवाल पुढील बैठकीत सादर करावा, असा निर्णय घेण्यांत आला.

.....८/-

बाब क्रमांक: १२/८

विषय :- उपकरपात्र इमारतींच्या पुनर्विकासासाठी "ना हरकत प्रमाणपत्र" प्रदान करणे.

उपकरपात्र "अ" वर्गातील इमारतींच्या पुनर्विकासासाठी "ना हरकत प्रमाणपत्र" प्रदान करण्याचे प्रस्ताव पृष्ठ क्र. १०९ ते १४१ वर सादर केले आहेत. सविस्तर चर्चेअंती पुढील प्रस्तावांना ना हरकतप्रमाणपत्र प्रदान करण्याचा निर्णय झाला.

१] इमारत क्र. २१, एस.के. बोले मार्ग, दादर, पृष्ठ क्र. १०९ ते ११५.

२] इमारत क्र. ४५, अनंत आश्रम, शिवाजी पार्क मार्ग क्र. २, पृष्ठ क्र. ११७ ते १२३

३] इमारत क्र. ४०-के व ४०-आर, परळ व्हिलेज, पृष्ठ क्र. १३५ ते १४१.

इमारत क्र. १२२ अशोक निवास, आर्देशार दादी स्ट्रीट इमारतीच्या पुनर्विकासाच्या प्रस्तावात भाडेकरूंची यादी, बांधकामाचे क्षेत्रफळ यासंबंधीची माहिती अपूर्ण असल्याचे सदस्यांनी निदर्शनास आणून दिले. सविस्तर चर्चेअंती परिपूर्ण प्रस्ताव पुढील बैठकीत सादर करावा, असे ठरले.

पूर्तता
निवासी कार्यकारी अभियंता.

ठराव क्रमांक: १२/९२

उपकर "अ" वर्गातील इमारतींच्या पुनर्विकासाच्या पुढीलप्रमाणे ३ प्रस्तावांना "ना हरकत प्रमाणपत्र" प्रदान करण्याचा निर्णय एकमताने घेण्यात आला.

१] अंतिम भूखंड क्र. ८६९-अ, नगररचना योजना क्र. ४ माहीम विभाग, इमारत क्र. २१, एस.के. बोले रोड, दादर.

२] भूकर पहाणी क्र. १८३९, भूखंड इमारत क्र. ४५ "अनंत आश्रम" शिवाजीपार्क, मार्ग क्र. २.

३] भूकर पहाणी क्र. ३४९ व ३५०, परळ-शिवडी विभाग, इमारत क्र. ४०-के व ४०-आर, परळ व्हिलेज.

....९/-

बाब क्रमांक: १२/९

विषय:- अध्यक्षांच्या परवानगीने आयत्या वेळेचे विषय.

[१] इमारत क्र. ६४, खत्तर गल्ली या इमारतीच्या पहिल्या टप्प्याच्या दुरुस्तीच्या अंदाजपत्रकांना प्रशासकीय मंजूरी मिळण्याविषयी.

या प्रस्तावाची टिप्पणी पृष्ठ क्र. १५३ वर सादर केली आहे. उपमुख्य अभियंता[दक्षिण] यांनी प्रस्तावाची माहिती दिली. या इमारतीचा काही भाग दि. १५.१०.९३ रोजी अचानकपणे कोसळला. जिवीतहानी टाळण्याच्या दृष्टीने या इमारतीस तातडीने दुरुस्तीची आवश्यकता असल्यामुळे या इमारतीच्या दुरुस्तीच्या अंदाजपत्रकास तातडीने मंजूरी द्यावी, अशी विनंती त्यांनी सभागृहास केली. या विषयावर सविस्तर चर्चा होऊन इमारतीची तातडीने दुरुस्ती करण्याची आवश्यकता असल्यामुळे अंदाजपत्रकास प्रशासकीय मंजूरी देण्याचा निर्णय झाला. इमारतींच्या दुरुस्तीचे अन्य प्रस्ताव दि. २२/१०/९३ रोजी होणाऱ्या उपसमितीच्या बैठकीपुढे सादर करावेत, असे ठरले.

ठराव क्रमांक: १२/९३

मातृ आशिष, ६४ खत्तर गल्ली, डी-१ विभाग या इमारतीच्या पहिल्या टप्प्याच्या दुरुस्तीच्या अंदाजित रु. २,९५,७१२ एवढया खर्चाच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मंजूरी देण्याचा निर्णय एकमताने घेण्यांत आला.

२/- श्री. पोतदार, कार्यकारी अभियंता इमारत प्रस्ताव, मुंबई महानगरपालिका यांनी सभागृहाच्या निदर्शनास आणून दिले की, माहीम येथील गांडे गिफट ही इमारत अत्यंत धोकादायक अवस्थेत असल्यामुळे या इमारतीच्या संदर्भात तातडीने निर्णय घेण्याची आवश्यकता आहे. चर्चेअंती या इमारतीच्या पुनर्विकासाचा प्रस्ताव पुढील बैठकीत सादर करावा, असे ठरले.

पूर्तता
निवासी कार्यकारी
अभियंता.

.....१०/=                                        १९

पूर्तता
सचिव

मंडळाची १३ वी बैठक मंगळवार दिनांक ३० नोव्हेंबर १९९३ रोजी सकाळी ११ वाजता आयोजित करावी, असे एकमताने ठरले.

मा. सभापती, उपसभापती, सदस्य, अधिकारी, व निमंत्रित यांचे आभार मानल्यानंतर अध्यक्षांच्या परवानगीने सभा संपन्न झाल्याचे जाहीर करण्यात आले.

सही/-
सचिव/दु. व पु.

सही/-
मुख्य अधिकारी
दु. व पु.

सही/-
सभापती/दु. व पु.

सचिव
मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना
मं३४०

सभापती
मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना
मं३४०